उपमुख्यमंत्री अजित पवार यांची कुंडमळा दुर्घटनास्थळी भेट

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in बुधवार दिनांक 18/06/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन ‖ पिंपरी चिंचवड व पुणे ‖ पान 4 ‖ अंक 134 ‖ RNI - MAHMAR /2021/51259 ‖ metrocity924@gmail.com



# अजित गव्हाणे यांची घरवापसी!

## सोबत ३६ माजी नगरसेवक



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या उपस्थितीत अजित गव्हाणे यांच्यासह एकूण ३७ माजी नगरसेवकांनी पक्षप्रवेश केला आहे. अजित गव्हाणे यांनी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शरद पवारांच्या पक्षात प्रवेश केला होता. विरोध असताना उमेदवारी मिळवली होती. परंतु, त्यांचा विधानसभा निवडणुकीत पराभव झाला. तेव्हा पासून ते पुन्हा स्वगृही परतणार असल्याची जोरदार चर्चा होती. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अजित गव्हाणे यांनी काही माजी नगरसेवकांसह शरद पवारांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश केला होता.

विधानसभा निवडणुकीदरम्यान वातावरण निर्मिती केली होती. अजित गव्हाणे हे भोसरीचे सध्याचे आमदार महेश लांडगे यांचा पराभव करतील, असा विश्वास व्यक्त केला जात होता. परंतु, त्यांचा विधानसभा निवडणुकीमध्ये पराभव झाला. यानंतर ते पुन्हा अजित पवारांसोबत येणार असल्याचं बोललं जात होतं. अखेर त्यांनी ३७ माजी नगरसेवकांसह अजित पवार गटात प्रवेश केला आहे. पुन्हा एकदा अजित पवारांनी शरद पवार गटाला धक्का दिला आहे.

**प्रवेश केलेल्या माजी नगरसेवकांची नावे खालील प्रमाणे..**

१) अजित दामोदर गव्हाणे (मा. स्थायी समिती अध्यक्ष) २) राहुल भोसले (माजी विरोधी पक्ष नेते) ३) डॉ. वैशाली घोडेकर (माजी महापौर) ४) समीर मासुळकर (मा. नगरसेवक) ५) गीताताई मंचरकर (मा. नगरसेविका) ६) संजय वाबळे (मा. नगरसेवक) ७) विक्रांत लांडे (मा. नगरसेवक) ८) पंकज भालेकर (मा. नगरसेवक) ९) प्रवीण भालेकर (मा. नगरसेवक) १०) संगीता ताम्हाने (मा. नगरसेविका) ११) रविंद्र सोनवणे (दिवंगत मा. नगरसेविका पती) १२) यश दत्ताकाका साने (मा. विद्यार्थी अध्यक्ष) १३) विनया तापकीर (मा. नगरसेविका) १४) अनुराधा गोफणे (मा. नगरसेविका) १५) सुमनताई पवळे (मा. स्थायी समिती अध्यक्ष) १६) संजय नेवाळे (मा. नगरसेवक) १७) वसंत बोराटे (मा. नगरसेवक) १८) भिमाताई फुगे (मा. नगरसेविका) १९) सारिका लांडगे (मा. नगरसेविका) २०) हनुमंत अण्णा भोसले (माजी महापौर ) २१) बबनराव बोराटे (माजी जेष्ठ नगरसेवक) २२) विश्वनाथ लांडे (मा. नगरसेवक) २३) तानाजी खाडे (मा. नगरसेवक) २४) शशिकिरण गवळी (मा. नगरसेवक) २५) शुभांगी संजय बोऱ्हाडे (मा. नगरसेविका) २६) वैशाली संजय उबाळे (मा. नगरसेविका) २७) स्वाती प्रमोद साने (मा. नगरसेविका) २८) मंदाताई उत्तम आल्हाट (मा. नगरसेविका) २९) शांताताई आल्हाट (मा. नगरसेविका) ३०) घनश्याम खेडेकर (मा. नगरसेवक) ३१) चंद्रकांत वाळके (मा. नगरसेवक) ३२) जालिंदर शिंदे (मा. नगरसेवक) ३३) विनायक रणसुभे (मा. नगरसेवक) ३४) ईश्वर ठोंबरे (मा. नगरसेवक) ३५) धनंजय भालेकर (मा. सभापती शिक्षण मंडळ) ३६) निवृत्ती मामा शिंदे (मा. सभापती शिक्षण मंडळ) ३७) नंदूतात्या शिंदे (मा. स्वीकृत सदस्य)

**प्रमुख पदाधिकारी प्रवेश-**

१) भरत लांडगे २) विकास साने ३) नितीन सस्ते ४) संदिप नेवाळे ५) संजय उदावंत ६) सम्राट फुगे

७) अमर फुगे ८) विराज लांडे ९) किशोर गव्हाणे १०) अजित रमेश गव्हाणे ११) सुनील लांडगे १२) विशाल आहेर १३) प्रसाद कोलते १४) अमृत अप्पा सोनवणे १५) तुषार फुगे १६) सुनील पठारे १७) सागर तापकीर १८) विपुल तापकीर ९) संजय तापकीर २०) दत्तात्रय बुर्डे २१) विशाल जाधव २२) निलेश जाधव २३) राहुल बनकर २४) युवराज पवार २५) सागर बोराटे २६) प्रवीण पिंजण २७) राहुल येवले २८) प्रसाद फिरोदिया २९) राजू खाडे ३०) मंगेश असवले ३१) अनिल तापकीर ३२) अनिल तापकीर ३३) सोमनाथ मोरे ३४) दत्तात्रय जगताप

## शहराच्या नियोजनबद्ध विकासासाठी काम करा - अजित पवार



पिंपरी चिंचवड शहराच्या नियोजनबद्ध विकासासाठी सर्वांनी एकत्र येऊन काम करावे व पिंपरी चिंचवड शहराचा विकास करावा तसेच शहराचा विकास करताना सामान्य नागरिकांना न्याय द्यावा ,असे अजित पवार यांनी आपल्या भाषणात सांगितले तसेच येणाऱ्या महानगरपालिका निवडणुकीमध्ये आपण कार्यकर्त्यांच्या पाठीशी असून अजित गव्हाणे व त्यांच्या सोबत आलेल्या सर्व आजी माजी नगरसेवक पदाधिकाऱ्यांचे स्वागत करत, येणारी महानगरपालिका निवडणूक मोठ्या ताकदीने लढवण्यासाठी कामाला लागण्याचे आदेश अजित पवार यांनी दिले. पिंपरी चिंचवड शहरात असणाऱ्या विविध समस्यांबद्दल अजित पवार यांनी भाष्य केले. कोणत्याही समाजाच्या नागरिकांना त्रास होणार नाही, अडचण येणार नाही याची काळजी घेत असल्याचे सांगत शहर विकास आराखड्यात अनेक कुटुंबाचे नुकसान होणार आहे अशा विकास आराखड्याला आपण स्थगती देण्याचा प्रयत्न करत असल्याचे अजित पवार यांनी सांगितले.

# पुन्हा तयारीला लागा-शरद पवार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : आगामी महानगरपालिकेच्या निवडणुकांमध्ये नवचैतन्य निर्माण करण्यासाठी आज शरद पवार यांनी पिंपरी- चिंचवड मध्ये मेळावा घेतला. पुन्हा पक्षाचा झेंडा खांद्यावर घेऊन तयारीला लागा, असं आवाहन यावेळी शरद पवार यांनी कार्यकर्त्यांना केलं आहे. निवडणुकीची तुम्ही काळजी करू नका. आपण सगळ्या जागा लढवू, आपल्या सोबत जो कोणी, महिला, तरुण येत असेल त्यांचं स्वागत आहे. आपण त्यांना संधी देऊ, असं देखील यावेळी शरद




पवार यांनी म्हटल आहे. शरद पवार हे पिंपरी -चिंचवड मध्ये संकल्प मेळाव्यामध्ये बोलत होते. पिंपरी- चिंचवड शहरात सत्ताधाऱ्यांनी वाटण्या केल्या आहेत. इथला कारभार स्वच्छ करण्यासाठी नागरिकांनी आगामी महानगरपालिकेत संघटनात्मक काम करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच नेतृत्व निवडून देण्यात यावं असं आवाहन देखील त्यांनी केलं आहे. गेलेल्यांची चिंता करू नका. आपल्याला नवीन नेतृत्वाची फळी निर्माण करायची आहे. असं ही शरद पवार म्हणाले.

ते म्हणाले, भाषण करताना कुणी तरी सांगितले की तुम्ही सगळ्यांना बरोबर घ्या. सगळ्यांना बरोबर घ्यायला काही चिंता करायचे कारण नाही. पण सगळे म्हणजे कोण?. गांधी- नेहरू चव्हाण यांचा विचार, फुले शाहू आंबेडकर यांचा विचार आणि हे सगळे असतील तर मला मान्य आहे. पण सत्तेच्यासाठी भाजप बरोबर जाऊन बसायचे ही भूमिका कुणी मांडत असेल हा विचार काँग्रेसचा विचार नाही.त्यामुळे कुणाशीही संबंध ठेवा पण भाजपशी संबंध हा काँग्रेसच्या विचारात असू शकत नाही. त्यामुळे अशा पद्धतीने संधी साधूपणाचे राजकारण आपल्याला प्रोत्साहित करायचे नाही. त्या दृष्टिकोनातून पावले आपल्याला टाकायची आहेत, असं शरद पवार यांनी स्पष्ट करत भाजप बरोबर जाणार नसल्याचे स्पष्ट केले.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांची कुंडमळा दुर्घटनास्थळी भेट

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मावळ तालुक्यातील कुंडमळा येथे साकव पूल पडून झालेल्या दुर्घटनेची माहिती उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी घटनास्थळी भेट देऊन घेतली. या ठिकाणी मंजूर करण्यात आलेल्या पुलाच्या बांधकामाला पावसाळ्यानंतर तातडीने सुरुवात करून लवकरात लवकर उभारणी करावी, असे निर्देश त्यांनी दिले.



यावेळी आमदार सुनील शेळके, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे पोलीस सहआयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण, अधीक्षक अभियंता बाप्पा बहिर, मावळचे प्रांताधिकारी सुरेंद्र नवले आदी उपस्थित होते.यावेळी उपमुख्यमंत्री पवार यांनी अधिकारी तसेच स्थानिकांकडून घटनेबाबत तसेच बचाव कार्याबाबत माहिती घेतली. तातडीने धाव घेऊन बचावकार्य केलेल्या स्थानिक नागरिकांना त्यांनी शाबासकी दिली.

यावेळी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधताना उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, मावळ तालुक्यात मोठ्या संख्येने पर्यटक येत असतात. त्यामुळे येथे पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने बचाव कार्यासाठी अत्याधुनिक वाहन जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून उपलब्ध करून देण्यात येईल. घटनेची चौकशी करण्यासाठी अपर जिल्हाधिकारी, उपवनसंरक्षक अधिकारी, सार्वजनिक बांधकाम मंडळाचे अधीक्षक अभियंता, पाटबंधारे मंडळाचे अधीक्षक अभियंता आदींसह निवासी उपजिल्हाधिकारी यांची समिती नेमली आहे, अशी माहितीदेखील त्यांनी दिली.

# 'ऑल इज वेल' चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

'तीन तिघाडा काम बिघाडा' ही म्हण खोटी ठरवत तीन मित्रांची धमाल दाखविणारा 'ऑल इज वेल' हा मराठी चित्रपट प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी २७ जूनपासून सर्वत्र प्रदर्शित होत आहे. तत्पूर्वी या चित्रपटाचा धमाकेदार ट्रेलर कलाकार व तंत्रज्ञांच्या उपस्थितीत नुकताच प्रकाशित झाला. याप्रसंगी निखळ हास्याची मेजवानी देणारा हा चित्रपट प्रेक्षकांना नक्की आवडेल, असा विश्वास दिग्दर्शक योगेश जाधव यांनी व्यक्त केला. तीन मित्रांची धमाल केमिस्ट्री आणि इतर कलाकारांचा मजेशीर अंदाज 'ऑल इज वेल' चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये दिसून येत आहे. या चित्रपटाच्या ट्रेलर प्रदर्शन सोहळ्यात बोलताना निर्माते अमोद मुचंडीकर, वाणी हालप्पनवर, तसेच सहनिर्माते मल्लेश सोमनाथ मरुचे, विनायक पट्टणशेट्टी म्हणाले की, 'काही तरी वेगळे करण्याच्या उद्देशाने आम्ही एकत्र आलो.प्रेक्षकांना धमाल करता येईल अशा कथानकाच्या शोधात असताना लेखक प्रियदर्शन जाधव, दिग्दर्शक योगेश जाधव आणि कार्यकारी निर्माते संजय ठुबे यांच्या सहकार्याने हा धमाल विषय आम्ही आणला आहे.



हा चित्रपट म्हणजे सहकुटुंब अनुभवायला मिळणारी हास्याची मेजवानी असून मनोरंजनाची अफलातून पर्वणी असणार आहे.' काही दिवसांपूर्वीच 'ऑल इज वेल' या चित्रपटाचे एक मजेदार पोस्टर प्रेक्षकांच्या भेटीला आल्यानंतर चित्रपटाविषयी उत्सुकता अधिकच वाढली होती. त्यानंतर आता चित्रपटाचा धमाल ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
बुधवार दिनांक 18/06/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# आज मुख्यमंत्री पिंपरी-चिंचवड शहरात

## विविध विकासकामांचे होणार भूमिपूजन




दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने पुणे-आळंदी पालखी मार्गावर वडमुखवाडी येथे उभारण्यात आलेल्या संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत नामदेव महाराज भेटीचे समुहशिल्प व संतसृष्टीचे लोकार्पण, संतपीठ येथील प्रेक्षागृह व कलादालन लोकार्पण यासह विविध विकास प्रकल्पांचे भूमिपूजन आणि उदघाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज १८ जून २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता होणार आहे, अशी माहिती पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली.

याप्रसंगी केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांची विशेष उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमास राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. याव्यतिरिक्त खासदार मेधा कुलकर्णी, सुनेत्रा पवार, सुप्रिया सुळे, श्रीरंग बारणे, डॉ. अमोल कोल्हे, आमदार अरूण लाड, उमा खापरे, जयंत आसगावकर, योगेश टिळेकर, अमित गोरखे, दिलीप वळसे पाटील, भीमराव तापकीर, विजय शिवतारे, महेश लांडगे, राहुल कुल, बापूसाहेब पठारे, सुनिल कांबळे, चेतन तुपे, शरद सोनवणे, सिद्धार्थ शिरोळे, सुनिल शेळके, बाबाजी काळे, हेमंत रासणे, शंकर मांडेकर, शंकर जगताप, ज्ञानेश्वर कटके यांची उपस्थिती असणार आहे. तसेच महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर हे देखील या कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. संतसृष्टीचा लोकार्पण कार्यक्रम थोरल्या पादुका, वडमुखवाडी, च-होळी येथे सकाळी १०.३० वाजता होईल. नवीन पिढीला आपल्या संस्कृतीमधील वारकरी संप्रदायाची व संतांची माहिती समजण्यासाठी संतसृष्टीची निर्मिती केली आहे.

संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत नामदेव महाराज यांच्या ऐतिहासिक भेटीचे स्मरणरूप 'संतसृष्टी' साकारण्यात आली आहे. या ठिकाणी मिश्र धातूपासून तयार करण्यात आलेली २५ शिल्पे असून ज्यामध्ये संत नामदेव महाराज,संत ज्ञानेश्वर महाराज, संत सोपान महाराज, संत निवृत्ती महाराज, संत मुक्ताबाई आणि २० वारकरी समाविष्ट आहेत. या शिल्पांसोबतच चौथरा, रिटेनिंग वॉल, स्टोन क्लॅडिंग, ओपन एअर थिएटर, विद्युत आणि बागकाम, रेलिंग व स्वच्छतागृह यांची कामेही पूर्ण झाली आहेत.

या परिसरात संतांच्या जीवनातील महत्त्वाच्या प्रसंगांवर आधारित ४७ ब्रॉन्झ म्युरल्स उभारण्यात आले असून, त्यांच्या शेजारी माहिती देणारे फलकही लावण्यात आले आहेत. या संतसृष्टीचे लोकार्पण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या शुभहस्ते होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे चिखली येथील संतपीठ येथे प्रत्यक्ष भेट देणार असून तेथे उभारण्यात आलेल्या प्रेक्षागृह व कलादालनाचे लोकार्पण त्यांच्या शुभहस्ते होणार आहे.पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने टाळगाव चिखली येथे "संतपीठ" स्थापन करण्यात आले आहे. यामध्ये तळमजला तसेच ५ मजले असे इमारतीचे नियोजन करण्यात आले असून त्याचे एकूण बांधकाम क्षेत्र १३१६१.७१ चौरस मीटर इतके आहे. या इमारतीमध्ये एकूण ४ उद्वाहक विकसित करण्यात आले आहेत. सोबतच दिव्यांग मुले आणि व्यक्तींकरिता रॅम्प ची सुविधा देखील करण्यात आली आहे. याशिवाय इमारतीमध्ये एकूण ५५ वर्गखोल्या,९ कार्यालये ,४० इतर खोल्या ज्यामध्ये प्रयोगशाळा, संगणक कक्ष, सभागृह, संगीत तथा वाद्य कक्ष, प्रत्येक मजल्यावर स्वच्छतागृहे, विद्यार्थ्यांना खेळण्याकरिता विस्तीर्ण मैदान आदींचे नियोजन केले आहे. इमारतीसाठी आवश्यक विद्युत व्यवस्था, अग्निशमन व्यवस्था करण्यासाठी विद्युत विभागाच्या कामांचा देखील यामध्ये समावेश आहे. या संतपीठामध्ये उभारण्यात आलेल्या प्रेक्षागृह आणि कलादालनाचे लोकार्पण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. तसेच याठिकाणी पिंपरी चिंचवड शहरात १ लाख ५० हजार देशी वृक्ष लागवड मोहिमेचा शुभारंभ मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात येईल.टाऊन हॉल चिखली येथे विविध विकासकामांचे ऑनलाईन पद्धतीने भूमिपूजन व लोकार्पण संतपीठ येथील कार्यक्रम झाल्यानंतर चिखली टाऊन हॉल येथे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांच्या वतीने विकसित ज्येष्ठानुबंध ज्येष्ठ नागरिकांकरिता अँप व ट्राफिक बडी वाहतूक नियमनाकरिता व्हॉट्स अँप प्रणालीचे लोकार्पण तसेच पिंपरी चिंचवड महापालिकेचे विविध विकास कामांचे भूमिपूजन, उदघाटन, लोकार्पण ऑनलाइन पद्धतीने मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने होणार आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक 18/06/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# गांजा विक्री करणाऱ्या कल्याणी देशपांडेला अटक !

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुण्यातील कुप्रसिद्ध कल्याणी देशपांडे ला पिंपरी- चिंचवडच्या अंमली विरोधी पथकाने आंध्रप्रदेशमधून बेड्या ठोकल्या आहेत. पिटासह मोका गुन्ह्यामध्ये शिक्षा भोगून आलेली कल्याणी गांजा विक्री रॅकेटची मास्टरमाइंड आहे. काही दिवसांपूर्वी अंमली पदार्थ विरोधी पथकाने कल्याणी देशपांडेच्या गांजा रॅकेटचा पर्दाफाश केला होता. तिच्या पतीसह जावयाला देखील पोलिसांनी बेड्या ठोकल्या होत्या. तेव्हा, कल्याणी देशपांडे फरार होण्यात यशस्वी झाली होती.




कल्याणीचा शोध पिंपरी- चिंचवड पोलीस घेत होते. याच दरम्यान कल्याणी देशपांडे ही आंध्रप्रदेशमधील इस्ट गोदावरी जिल्ह्यातील राजनगरममध्ये भाड्याच्या खोलीने राहत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. अंमली पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांच्या टीम त्याठिकाणी पोहचली. सापळा रचून तिला अटक करण्यात आली आहे.

कल्याणी देशपांडे गांजाच रॅकेट चालवायची. काही दिवसांपूर्वी बावधन येथील निवस्थानी छाप मारून २० किलो गांजा जप्त केला होता.

पती, जावई ला बेड्या ठोकल्या होत्या. कल्याणीचा शोध घेत असताना तिला देखील आंध्रप्रदेशमधून अटक करण्यात आली आहे. कल्याणी देशपांडेच काही वर्षांपूर्वी वेश्याव्यवसायाच जाळ होत. पिटा आणि मोका गुन्ह्यात शिक्षा भोगून आलेली आहे. अधिक चा तपास अमली पदार्थ विरोधी पथक करत आहे.

# उधारीवर दारू न दिल्याने कामगाराला मारहाण

शहरातील येरवडा भागात उधारीवर दारू न दिल्याने वाईन शा ॅपमधील एका कामगाराला बेदम मारहाण करण्यात आल्याची घटना घडली.

या प्रकरणी येरवडा पोलिसांनी एकाला अटक केली. रोहित पिल्ले (वय २५, रा. जयजवानगर, लक्ष्मीनगर, येरवडा) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, येरवडा भागातील एका वाईन शा ॅपमध्ये रविवारी रात्रीच्या सुमारास आरोपी रोहित पिल्ले हा गेला होता.

त्यावेळी तेथील कामगाराकडे त्याने उधारीवर दारूची बाटली मागितली.उधारीवर दारू देण्यास कामगाराने नकार दिला.त्यामुळे आरोपी रोहित पिल्ले हा चिडला




आणि कामगाराला लाथाबुक्क्यांनी मारण्यास सुरुवात केली.त्या मारहाणीत कामगाराचा दात पडला आणि गंभीर दुखापत देखील झाली.

या मारहाण प्रकरणी येरवडा पोलीस स्टेशन येथे तक्रार देताच,आरोपी रोहित पिल्ले विरोधात याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करुन त्याला अटक करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

# 'आनंद ज्येष्ठ नागरिक संघांचा' पहिला वर्धापन दिन संपन्न

थेरगाव येथील 'आनंद ज्येष्ठ नागरिक संघांचा' पहिला वर्धापन दिन '१९ ग्रँड वेस्ट सोसायटीच्या' आवारात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. जेष्ठ नागरिक संघात एकूण १०९ नोंदणीकृत प्राथमिक सदस्य आहेत..ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष सिताराम आरुडे यांचे हस्ते दीप प्रज्वलन, सल्लागार चंद्रकांत पाठक यांच्या हस्ते प्रतिमा पूजन तर सचिव ईश्वर शिवणे यांचे हस्ते श्रीफळ वाढवून गणेश वंदनाने कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला..सुमधुर मराठी व हिंदी गाणी, अभंग, मनमोहक नाट्यगीते, नेत्र दीपक नृत्य, हास्य रसात बुडवून टाकणारे




कलात्मक ॲक्ट असे विविध प्रकारचे मनोरंजनात्मक कार्यक्रम या स्नेहमिलनाच्या निमित्ताने सादर करण्यात आले. देश व राज्य संरक्षण सेवेतून निवृत्त झालेल्या सदस्यांचा सत्कार करण्यात आला तसेच केक कापून वर्धापन दिन साजरा करण्यात आला..सीताराम आरुडे यांनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणात ज्येष्ठ नागरिक संघाच्या माध्यमातून मागील एक वर्षांच्या कामाचा आढावा दिला. मागील वर्षभरात विविध उपक्रम राबविले. प्रामुख्याने वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, पर्यावरण, ज्येष्ठांचे आरोग्य कसे राखले जावे याबाबत तज्ञांचे मार्गदर्शनपर व्याख्यान असे अनेक लोकोपयोगी कार्यक्रम राबविले आहेत. या कार्यक्रमांमुळे ज्येष्ठ नागरिकांना फायदा झाला आहे. तसेच ७५ वर्ष व त्यापुढील सदस्यांना सन्मान चिन्ह देऊन गौरविणे, मासिक वाढदिवस साजरे करणे, शासकीय कार्यक्रमात जेष्ठांनी भाग घेणे, सोसायटीतील मंदिर परिसर स्वच्छ ठेवणे, त्याचबरोबर गणेश उत्सव व इतर धार्मिक सण उत्साहात साजरे करणे, मा. पोलीस आयुक्त कार्यालयाकडून आलेल्या 'ज्येष्ठाणुबंध' ॲप मध्ये सोसायटीमधील ज्येष्ठांची माहिती भरून पोलिसांना सहकार्य करणे असे विविध प्रकारचे उपक्रम संघा मार्फत राबविण्यात आलेले आहेत..या प्रसंगी ज्येष्ठ नागरिक संघाचे खजिनदार सुनील मंडलिक, सह खजिनदार डॉ. सुनील शिंदे, उपाध्यक्षा संगीता तातार, सह सचिव मारुती जाधव, महिला सदस्या श्रीमती सुनिता नवसे, सदस्य दिलीप जिरवणकर, सदस्य प्रदीप मुनोत यांच्या सह ज्येष्ठ नागरिक संघाचे पदाधिकारी उपस्थित होते..आशिष कोठावदे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर सचिव ईश्वर शिवणे यांनी आभार मानले.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968